महाराष्ट्र शासन

क्र.सकआ २०१८/प्र.क्र.२२४/आस्था-२,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २८ मे, २०१९.

आदेश

या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील समाज कल्याण आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील समाज कल्याण अधिकारी व तत्सम गट-ब (सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु.९३००-३४८००, ग्रेड पे रु.४४००) या संवर्गातील खालील अधिकाऱ्यांना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व तत्सम गट-अ (सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु.९३००-३४८००, ग्रेड पे रु.५०००) या संवर्गात खालील अटींच्या अधिन राहुन, तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे.

क्र	अधिकाऱ्यांचे नाव	सध्या कार्यरत असलेले ठिकाण	पदोन्नतीने पदस्थापने ठिकाण
१	श्री. डी. जी. नांदगावकर,	संशोधन अधिकारी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक	सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, धुळे या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.
२	श्री.पियुष चव्हाण,	संशोधन अधिकारी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अकोला.	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.
३	श्री. वाय. एस. पाटील,	विशेष अधिकारी (शानिशा), गट-ब, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचे कार्यालय, जळगाव.	सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जळगाव या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.
४	श्री. आर. एच. एडके,	विशेष अधिकारी (शानिशा), गट-ब, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचे कार्यालय, लातूर.	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.
५	श्री. एस. एन. चिकुर्ते	समाज कल्याण अधिकारी, गट-ब, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचे कार्यालय, जालना.	सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, उस्मानाबाद या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.
६	श्रीम. एस. व्ही. तेलगोटे	समाज कल्याण अधिकारी, गट-ब, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण यांचे कार्यालय, नागपूर.	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.
७	श्री. एस. व्ही. आऊलवार	समाज कल्याण अधिकारी (विजाभज), गट-ब, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांचे कार्यालय, नांदेड	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

२. अटी व शर्ती -

१) सदर पदोन्नत्या सेवाप्रवेश नियमानुसार पाच वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच समितीच्या मान्यतेनुसार अट शिथिल करून देण्यात येत आहेत. सबब पाच वर्ष पूर्ण झाल्यानंतर सदरहू तात्पुरत्या पदोन्नत्यांचा आढावा घेवून, पाच वर्ष पूर्ण झालेल्या व नियमानुसार पात्र असलेल्या ज्येष्ठ कर्मचाऱ्यांची नियमित निवडसूची पुन्हा करण्याच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

२) पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायलयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून भरण्याबाबत सा.प्र.वि./१६-ब यांनी दिनांक २९.१२.२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनुसार मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी सदर अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

४) समाज कल्याण अधिकारी संवर्गाच्या दि.१.१.२०१५ ते दि.१.१.२०१८ या कालावधीच्या ज्येष्ठता यादीतील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांच्या बाबतीत त्यांनी विहीत संधीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण केल्यास, याबाबत आढावा घेवून, ज्येष्ठतेनुसार त्यांना पदोन्नती देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल. अशी कार्यवाही करताना पदोन्नतीच्या संवर्गात पुरेशी पदे उपलब्ध नसल्यास कनिष्ठ कर्मचाऱ्यांना पदावनत करण्याची कार्यवाही देखील करावी लागेल.

३. वरील सर्व संबधित अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्याकरिता आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी त्यांचेकडील कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपवून तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे.

४. प्रस्तुत शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०१९०५२९१२००२८१५२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2019.05.29 12:08:03 +05'30'

(ज्ञा. ल. सुळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संबधित अधिकारी (व्दारा :- आयुक्त, समाज कल्याण, पुणे)

प्रत,

१. आयुक्त, समाज कल्याण, पुणे
२. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे
३. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
४. महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
५. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण
६. मा. मंत्री/मा. राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७. मा.प्रधान सचिव (सा.न्या.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१०. आस्था -२ निवडनस्ती